# 6. स्टँडअप इंडिया

6.1 परीचय :-

देशातील अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती आणि महीला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयामार्फत व वित्तीय सेवा विभागामार्फत ही योजना एप्रिल, 2016 मध्ये सुरू करण्यात आली आहे.

स्टँडअप इंडिया स्कीम ग्रीन फिल्ड उपक्रम स्थापित करण्यासाठी किमान 1 अनुसुचित जाती किंवा जमाती कर्जदाराला आणि प्रत्येक बँकेच्या शाखेत किमान 1 महिला कर्जदाराला उद्योग करण्यासाठी 10 लाख ते 1 कोटी रुपयांपर्यंत बँक सुलभ कर्ज उपलब्ध करून देते. हा उद्योग उत्पादन सेवा आणि व्यापार क्षेत्रात ही असु शकतो. वैयक्तिक नसलेल्या उद्योगाच्या बाबतीत भागधारक आणि नियंत्रित भाग भांडवलाचा किमान 51% हिस्सा अनुसुचित जाती / जमाती किंवा महिला उद्योजकांचा असावा.

2 स्टँडअप इंडियाची वैशिष्ट्ये :-

1) SC, ST आणि महीला उद्योजक यांना वित्तपुरवठा करण्यासाठी स्टँडअप इंडिया या योजनेची स्थापना करण्यात आली आहे.

2) या योजनेमध्ये SC, ST आणि महिला उद्योजक 18 वर्षापेक्षा जास्त वयाचे असले पाहीजेत. या योजनेअंतर्गत ग्रीन फिल्ड प्रकल्पासाठी कर्ज उपलब्ध होते.

3) यामध्ये 51% हिस्सा संबंधित लाभार्थी घटकाच्या असला पाहिजे. तसेच ते कोणत्याही बँकेत किंवा वित्तीय संस्थेत डिफॉल्टर (दोषी) असु नये.

4) या योजनेअंतर्गत मुदत कर्ज आणि कार्यरत भांडवलासह एकत्रित ~~[illegible]~~ 10 लाख ते 100 लाख पर्यंत कर्ज उपलब्ध होते.

5) या योजनेअंतर्गत SC, ST आणि महीला उद्योजक यांना उत्पादन, व्यापार किंवा सेवा क्षेत्रात नविन उपक्रम स्थापन करण्यासाठी कर्ज दिले जाते. प्रकल्पाच्या ७५% किमतीचे संमिश्र कर्ज मुदत कर्ज म्हणुन आणि कार्यशील भांडवलाचा त्यामध्ये समावेश केला जातो. प्रकल्प खर्चाच्या २% पेक्षा जास्त कर्जाचे योगदान लागु होणार नाही.

6) प्राथमिक सुरुवातीच्या व्यतिरीक्त कर्ज बँकेने ठरविल्यानुसार क्रेडिट गॅरंटी फंड योजनेच्या द्वारे स्टँडअप इंडीया अंतर्गत कर्जासाठी सुलभ / सुरक्षित केले जाऊ शकते.

7) कर्जाची परतफेड जास्तीत जास्त ७ वर्षात करता येऊ शकते.

8) ऑनलाइननोंदणी आणि समर्थन सेवासाठी लोकांना मदत करण्यासाठी एक वेब पोर्टलतयार केले

9) कर्जावरील व्याजदर त्याच्या श्रेणीसाठी मुलभूत कर ३% अधिक ट्रेलर प्रिमीअम जास्त न करण्यासाठी कमीत कमी लागु असेल

10) या योजनेत २५% मार्जीन मनीची कल्पना आहे. जी पात्र केंद्र व राज्य सरकारच्या योजनांसह अभिसरणा म्हणुन प्रदान केली जाऊ शकते. मान्यता प्राप्त अनुदानाचा लाभ घेण्यासाठी किंवा मार्जिन मानीची आवश्यकता पुर्ण करण्यासाठी अशा योजना आखल्यात येत असतात.

11) सीडबी (SIDBI) मार्फत पुनर्वित खिडकीपी 10000 कोटी रुपयाचे कॉपर्स तयार करणे

*6.9 स्टँडअप इंडीया कर्ज योजनेअंतर्गत पात्रता निकष :—

स्टँडअप या योजनेद्वारे भारत सरकारने अजुन एक पुढाकार घेतला आहे. या योजनेनुसार पात्र उमेदवारांना त्यांच्या स्वतःच्या व्यवसायाची सुरुवात करुन निश्चित रक्कम दिली जाईल. या कर्जाची सुविधा विशेषतः मागासवर्गीय आणि आर्थिक दृष्टया कमकुवत गटातील लोकांसाठी बनवली गेली आहे. तसेच महीला विशेषतः विधवा महीला कर्जासाठी अर्ज करण्यास पात्र आहे. अधिकाऱ्यांच्या मते, आर्थिक कमतरतेमुळे बहुतेक

भारतीय उद्योजक सुरुवातीला अयशस्वी झाले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत व्यावसायिकीकरण करण्यासाठी सक्षम असलेल्या संभाव्य व्यावसायिक मालकीसाठी या योजनेची सुरुवात भारत सरकारने केली आहे. स्टँडअप इंडीया कर्जासाठी अर्ज करण्यापुर्वी एक मोल्यखपत्र आवश्यक आहे. तसेच पात्रतेचे काही निकष खालीलप्रमाणे आहेत :—

1) कंपनीचे स्वरूप :—

आपल्या मालकीची कंपनी आवश्यक आहे. कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत खाजगी मर्यादीत कंपनी असली पाहीजे. LLP अधिनियम २००८ अंतर्गत नोंदणीकृत LLP संस्था असावी. भारतीय भागीदारी अधिनियम १९३८ अंतर्गत नोंदणीकृत भागीदारी संस्था होय.

२) उलाढाल :—

आपण चालवित असलेल्या कंपनीची २५ कोटी रु. वार्षिक उलाढाल असणे आवश्यक आहे. आपल्या वार्षिक व्यवहारास निधी ७८ कोटी उलाढाल मर्यादा ओलांडल्यास आपण त्यासाठी पात्र होणार नाही.

3) कंपनीची वयोमर्यादा :—

स्टँडअप इंडिया योजनेसाठी अर्ज करणारी कंपनी ५ वर्षापेक्षा जास्त जुनी असु नये. म्हणजेच कंपनीची स्थापना मागील पाच वर्षात झालेली असणे आवश्यक आहे. कंपनीच्या कार्यकाळात कंपनीच्या नोंदणीच्या तारखेपासुन ही गणना केली जाईल.

४) उत्पादने आणि सेवांचे स्वरूप :—

स्टँडअप इंडिया भारतीय औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या विकासाचे आणि व्यावसायीकीकरणास समर्थन देते. म्हणुन आपल्या कंपनीने प्रदान केलेली उत्पादने किंवा सेवा व्या-वसायिकीकरण उपाययोजना विकास आणि नुतनीकरण प्रक्रीयेस प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे.

5) पेटंट :—

स्टॅंडअप इंडीयाच्या दिशा निर्देशानानुसार DIPP कडुन मंजुर होणे आवश्यक आहे. कर्जासाठी अर्ज करतांना आपण सादर केलेल्या अनेक पत्रांपैकी एक पेटंट आहे. DIPP च्या मार्गदर्शक तत्त्वाचे पालन करण्यासाठी आपल्या कंपनीचे पेटंट मंजुर केले पाहीजे तरच पेटंट हे मंजुर होत असते.

6) इतर कागदपत्रे :—

कर्जासाठी अर्ज करण्यापुर्वी काही अन्य कागदपत्रे आवश्यक आहेत ते खालीलप्रमाणे :—

1) PG इंडिअन कॉलेजमध्ये इनक्युबेटरद्वारा शिफारस पत्र.
2) भारतीय शासनाकडुन निधी उभारलेल्या इनक्युबेटरकडुन शिफारस पत्र.
3) भारतीय शासनाद्वारे मान्यताप्राप्त इनक्युबेटरद्वारा शिफारस पत्र.
4) व्यवसायाशी संबंधित भारतीय पेटंट आणि ट्रेडमार्क कार्यालयाद्वारे मान्यता प्राप्त पेटंट.
5) खाजगी इक्वीटी फंड, देवदुत निधी, प्रवेगक नेटवर्कद्वारे नि

तुमच्या कडे यासर्व अक्षरे व कागदपत्रे सर्वांनी करावयाची भारतीय कर्ज योजनेच्या आधारे सादर करणे.

✱ स्टॅंडअप इंडियासाठी पात्रता आणि निकष काय आहेत ?

कंपनीचे स्वरूप काय आहे ?, खाजगी मर्यादीत कंपनी, भागीदारी संस्था, मर्यादीत दायीत्व भागीदारी या कायद्याअंतर्गत नोंदणी आहे काय ?, कंपनीचे वय काय आहे ? ते पाच वर्षापेक्षा जास्त नाही याची पाहणी करणे, तसेच कंपनी सुरू असावी, दरवर्षी 25 कोटीपेक्षा जास्त उत्पन्न नसावे.

✱ 6) स्टॅंडअप इंडियाचे फायदे :—

पुर्वी रोजगार योजनेशी संबंधित अनेक योजना भारतात सुरु केल्या आहेत. स्टॅंडअप इंडियाची योजना भारतात मागासवर्गीय लोकांसाठी फायदेशीर ठरली आहे तसेच ही

योजना महिला उद्योजक व अर्थव्यवस्थेतील मागासवर्गीय व्यक्तींसाठी अत्यंत फायदेशीर आहे. या योजनेअंतर्गत खालील फायदे लाभार्थी घटकांना मिळतात.

1) सहज वित्तपुरवठा :—

भारतात सुरुवातीचे व्यवसाय वित्तपुरवठा करण्यासाठी ही योजना सरकारने सुरु केली. बहुतेक स्टार्टअप उद्योग वित्तीय अस्थिरतेमुळे यश मिळविण्यास अयशस्वी झाले. म्हणून या योजनेअंतर्गत SC, ST, आणि महिला उद्योजक यांना उद्योगासाठी प्रारंभिक वित्तपुरवठा सहज या योजनेद्वारे करण्याची तरतुद आहे.

2) पुनर्वित्तपुरवठा करणे :—

या योजनेअंतर्गत केवळ प्रारंभिक अर्थसाहाय्य देणे या उद्देशाबरोबरच आजारी उद्योजक उद्योगांसाठी उद्योजकांना त्यांचा उपक्रम सुरु ठेवण्यासाठी पुनर्वित्त पुरवठ्याची या योजनेत तरतुद आहे.

3) कर्जपुर्व प्रशिक्षण योजना :—

या योजनेअंतर्गत कर्जाची पुर्तता करण्यापुर्वी कर्ज प्रशिक्षण देऊन त्यासंबंधी सर्व प्रशासकीय आणि तांत्रिक बाबींविषयी सरकारी नोकरांना तसेच लाभार्थींना या योजनेसंदर्भात प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे कर्जसुविधा लवकर प्राप्त होऊन कर्जाची पुर्ततासुद्धा लवकर होते.

4) व्यवसायाचे बंधन नाही :—

या योजनेअंतर्गत व्यवसाय प्रकाराचे बंधन नाही. या योजनेअंतर्गत कोणताही व्यवसाय सुरु करु शकतो. अलीकडे तंत्रज्ञानाचे ई-कॉमर्स, इंटरनेट संशोधन, ऑनलाईन विपणन अशा प्रकारचे व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरु होत असुन या व्यवसायांना या योजनेअंतर्गत समर्थन दिले जात आहे.

5) कर सवलत :-

या योजनेअंतर्गत लाभार्थींना ३ वर्ष करात सवलत मिळते. याचा अर्थ असा की, त्या व्यवसायिकांना पुढील ३ वर्षासाठी आयकर भरण्याची आवश्यकता राहत नाही.

* स्टँडअप इंडियाचे दोष :-

भारतामध्ये उद्योजकता वाढीसाठी व आर्थिक सुविधा देण्यासाठी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी ही योजना सुरू केली. ही योजना काही लोकांसाठी खुपच आकर्षक वाटत असली तरी या योजनेत बरेच दोष आणि कमतरता आहेत. त्या खालीलप्रमाणे

1) बँकांसाठी नुकसानकारक :-

ही योजना बाजारातील व्याजदरापेक्षा खुप कमी व्याजाने कर्जपुरवठा करते. हा कमी व्याजाने कर्जपुरवठा देशातील गरीब लोकांसाठी केला जातो. परंतु बँकांसाठी निश्चितच तो नुकसानकारक आहे. कारण बँकांना दिलेल्या कर्जाची परतफेड वेळेवर होत नाही. त्यामुळे बँकांचे NPA चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत असते आणि ते बँकांसाठी लाभकारक नाही.

२) कमकुवत कर रचना :-

भारतात कर रचना निश्चीतपणे कमकुवत स्वरूपाची आहे. भारतात अशा कोणत्याही प्रकारचे शासनाकडून कररचना निश्चित स्वरूपाची ठरवण्यात आलेली नाही. यामध्ये वारंवार बदल केले जातात. त्यामुळे मोठ्या गुंतवणुकींना अनेक अडचणी सुद्धा येतात.

3) तांत्रिक अवलंबित्व :-

सुरूवातीच्या सर्वेक्षणात असे दिसुन आले आहे की, भारतातील बहुतांश यशस्वी स्टँडअप उद्योग नविन तंत्रज्ञानावर अवलंबुन आहेत. परंतु भारताची परीस्थिती बघता भारतात ग्रामीण भागापर्यंत सर्वच ठिकाणी नविन तंत्रज्ञान अद्यापही पोहोचलेले नाही. या योजनेअंतर्गत गरीब लोक, मागासवर्गी

दलीत व महीला उद्योजक अर्ज करू शकतात. अशा घटकांना तंत्रज्ञानाच्या माहितीबद्दल किंवा विकासाबद्दल जाणीव अत्यंत कमी आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ ग्रामीण भागापर्यंत पाहीजे त्या प्रमाणात पोहचत नाही.

4) परदेशी हस्तक्षेप :-
भारतात परकीय कंपन्या भविष्यात मोठ्या प्रमाणावर सुरू होण्याची शक्यता असून त्या कंपन्यांशी स्पर्धा स्टँडअप योजनेअंतर्गत सुरू केलेले उद्योग करू शकणार नाहीत म्हणून स्टँडअप अंतर्गत स्थापन केलेले उद्योग भविष्यात योग्य भुमिका पार पाडतीलच याबाबत खात्री देता येत नाही.

5) दुर्बल पायाभूत सुविधा :-
व्यवसाय किंवा स्वयंरोजगार कार्यक्रमासाठी वित्त-पुरवण्याऐवजी सरकारने विज, रस्ते विकास, मुलभूत शिक्षण अशा गोष्टीकडे सुरुवातीला लक्ष देणे आवश्यक आहे. उपरोक्त सुविधा अद्यापही ग्रामीण भागापर्यंत पोहचविलेल्या नाहीत. त्यामुळे उद्योग व्यवसाय करण्याला छोट्या व्यवसायीकांनासुद्धा अडचणी निर्माण होतात.

(6) स्टँड अप इंडिया अंतर्गत आवश्यक कागदपत्रे -

1) ~~ओळख~~ स्टँडअप इंडिया अंतर्गत तीन मार्गांनी कर्जासाठी अर्ज करू शकते
1) थेट बँकेच्या शाखेमार्फत
2) स्टेट ऑफ इंडिया पोर्टल
3) अग्रणी जिल्हा व्यवस्थापक (एलडीएम) स्टँड अप इंडिया पोर्टलवर उपलब्ध एलडीएम ची यादीतील).

आवश्यक कागदपत्रे -
1) ओळखीचा पुरावा - मतदार ओळखपत्र / पासपोर्ट / ड्रायव्हिंग लायसन्स / पॅन कॉर्ड / स्वामित्वकर्त्याच्या सदस्याच्या बँकर्सकडून स्वाक्षरी ओळख, संचालकाचा भागीदार
2) निवासाचा पुरावा - अलिकडील टेलिफोन बिल, विजेचे बिल, मालमत्ता कर पावती

पासपोर्ट / मतदार मालकांचे ओळखपत्र, संचालक, भागीदार (कंपनी असल्यास)

3) व्यवसायाच्या पत्त्याचा पुरावा.
4) अर्जदार कोणत्याही बँक / एफआयमध्ये डिफॉल्टर असू नये
5) कंपनीच्या सहकार्याचे निवेदन / भागीदारांचे भागीदारी करार इ.
6) नवीनतम आयकर विवरणसह प्रवर्तक आणि गॅरंटर्स मालमत्ता आणि उत्तरदायित्व विधान —
7) भाडे करार (भाड्याने घेतल्यास व्यवसाय परिसर) आणि लागू असल्यास प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मंजुरी
8) लागू असल्यास एसएसआय / एमएसएमई नोंदणी
9) कार्यरत भांडवलाच्या मर्यादेच्या बाबतीत आणि मुदतीच्या कर्जाच्या कालावधीत कर्जाच्या कालावधीसाठी पुढील दोन वर्षे प्रस्तावित ताळेबंद
10) प्राथमिक आणि दुय्यम सिक्युरिटीज म्हणून सर्व मालमत्तांच्या लीज डीड / टायटल डायपत्र उपलब्ध असावी
11) अर्जदार एससी / एसटी प्रवर्गातील आहे किंवा नाही तेथे अर्ज करण्यासाठी कागदपत्र
12) कंपनीतील बहुतांश भागधारक अनुसूचित जाती / जमाती / मागासवर्गातील (स्वाद्याच व्यक्तीच्याच ताब्यात आहे किंवा नाही हे स्थापित करण्यासाठी आरओसी कडून समावेशाचे प्रमाणपत्र
13) युनिटचे प्रोफाइल (प्रवर्तकांची नावे, कंपनीतील इतर संचालकांची नावे सर्व कार्यालये आणि पत्ते, शेअरहोल्डींग पॅटर्न इ.)
14) प्रकल्प अहवाल (प्रस्तावित प्रकल्पासाठी मुदत निधी असल्यास) ताब्यात घ्यावयाच्या यंत्रणेचा तपशील, कोणाकडून अधिग्रहण करणार, किंमती, पुरवठा करणाऱ्यांची नावे, मशिन्सची क्षमता वापरण्याची क्षमता, उत्पादन विक्री, प्रस्तावित नफा व तोटा आणि कर्जाच्या कालावधीच्या ताळेबंद, कामगार, कामगार यांना वेळासंबंधीचा अहवाल, वित्तीय तपशीलाच्या गणितांचा आधार इ.

15) सहयोगी / गट कंपन्यांची मागील तीन वर्षांची ताळेबंद (असल्यास)
16) उत्पादन प्रक्रियेस लागू असल्यास कंपनीतील कार्यकारी अधिकारी यांचे एक मोठे प्रोफाइल, कोणतेही टायअप वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाविषयी आणि त्यांच्या पुरवठादारांचे तपशील, खरेदीदाराविषयी तपशील, प्रतिस्पर्ध्यांच्या तुलनेत कंपनीचे सामर्थ्य व कमकुवतपणा इ.

6.3 ~~कर्ज पात्रता~~ स्टॅंडअप योजना पात्रता निकष Eligibility [illegible]

1) स्टॅंडअप इंडिया योजने अंतर्गत कर्ज एससी, एसटी, किंवा महिला उत्पादकांकडून उत्पादन व्यापार किंवा सेवा क्षेत्रात नवीन व्यवसाय स्थापित करण्यासाठी वापरले जाऊ शकते. योजने अंतर्गत कर्ज घेण्यासाठी उद्योजकांनी खालील पात्रतेच्या निकष पूर्ण केलेले असले पाहिजे
1) अर्जदार एससी / एसटी आणि 18 वर्षापेक्षा जास्त वयाच्या महिला उद्योजक असणे आवश्यक आहे
2) उत्पादन केवळ सेवा किंवा व्यापार क्षेत्रातील स्टार्टअप किंवा नवीन व्यवसायासाठी कर्ज दिले जाऊ शकते
3) खाजगी मर्यादित कंपनीच्या बाबतीत 51% भाग हे एससी / एसटी आणि महिला उद्योजकांकडे असावे
4) अर्जदार कोणत्याही बॅंक / वित्तीय संस्थेत डिफॉल्टर नसावा

6.4 स्टॅंडअप इंडिया योजनेबाबतची महत्वाची तथ्ये (Important facts about standup India scheme)

1) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एप्रिल 2016 मध्ये या योजनेची सुरुवात केली आणि ~~[illegible]~~ लोगो लॉन्च केला.
2) ही योजना महिला आणि एसटी व एससी समुदायामध्ये उद्योजकता करण्यास मदत करते
3) या योजने अंतर्गत रिक्षा ज्या या गटात बसणाऱ्या लोकांच्या नाहीत अशा लोकांना ई-रिक्षा दिली जाईल या योजनेचे लाभार्थी गरीब असतील
4) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या योजनेच्या 'ओला' ने सुद्धा ई-रिक्षा बुकिंग ची सुविधा दिली
5) योजनेचा उद्देश अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांमध्ये उद्योजकता वाढविणे हा मुख्य आहे. त्यासाठी 10 लाख ते 1 कोटी या संयुक्त कर्जाच्या समावेश आहे (Bhartiya micro credit)
6) अर्थक्रमात भारतीय सूक्ष्म पत (बीएमसी) च्या भागीदारीत एज्युकेशन ओला ई-रिक्षा सुरु करण्यात येणार असून दिल्ली, गुडगाव, फरिदाबाद आणि गाझियाबाद येथे तैनात करण्यात येतील
7) बाबू जगजीवन राम यांच्या 108 व्या जयंतीनिमित्त स्टॅंडअप इंडिया योजना सुरु ~~[illegible]~~ करण्यात आली आहे.

6.6 कर्ज

## कर्ज अर्ज करण्याबाबतची प्रक्रिया

1) कर्ज घेणाऱ्यांच्या पॅरामीटर्स/मेट्रिकसाठी एक महत्वपूर्ण पोर्टल/इंटरफेस सार तयार केले त्यामध्ये 8 ते 10 प्रश्नांचा संच असेल आणि अशा कर्जदार अर्जदाराला माहिती आणि अभिप्राय प्रदान करेल. संभाव्य कर्जदारास वरील पोर्टलवर नोंदणी करणे आणि भेट देऊन नंतर नोंदणीचा पर्याय असतो. या पोर्टलवर घरी, कॉमन सर्व्हिस सेंटरमध्ये (सीएससी), बँक शाखेत किंवा एलडीएम द्वारे प्रवेश केला जाऊ शकतो. ज्या शाखांमध्ये इंटरनेटचा वापर प्रतिबंधित आहे तेथे शाखा कार्यकारी संभाव्य कर्जदारास इंटरनेट प्रवेश बिंदूबाबत मार्गदर्शन करेल.

साधारणपणे खालील प्रश्न त्यामध्ये असतात

1) कर्जदाराचे स्थान (2) वर्ग- अनुसूचित जात/जमाती/महिला

3) व्यवसायाचे नियोजित स्वरूप (4) व्यवसायाच्या जागेची उपलब्धता

5) प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी सहकार्य करण्यात येते

6) कौशल्य आर्थिक/तांत्रिक आवश्यक (7) सध्याच्या बँक खात्याचा तपशील

8) प्रकल्पात स्वतःच्या गुंतवणुकीचे प्रमाण (9) मार्जिन मनी जमा करण्यासाठी मदतीची गरज आहे का? (10) व्यवसायातील मागील कोणतेही अनुभव

योग्य प्रतिसादाच्या आधारे पोर्टल संबंधित अभिप्राय देते आणि पोर्टलला भेट देणाऱ्या कर्जदार किंवा प्रशिक्षण घेणारा म्हणून वर्गीकृत करण्यास मदत करतात.

रेडी कर्जदार - जर कर्जदाराला हॅंडहोल्डिंग समर्थन आवश्यक नसेल तर पोर्टलवर रेडी कर्ज घेणारा म्हणून नोंदणी केल्यास निवडलेल्या बँकेत कर्जासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू होते.

प्रशिक्षणार्थी कर्जदार - जर कर्जदार हॅंडहोल्डिंगची आवश्यकता दर्शवित असेल तर पोर्टलवर प्रशिक्षणार्थी कर्जदार म्हणून नोंदणी केल्यास कर्ज घेणाऱ्याला संबंधित जिल्ह्यातील एलडीएम आणि सिडबी/नाबार्डच्या संबंधित कार्यालयाशी जोडली जाईल.

यासंबंधी अधिक माहितीसाठी जवळच्या आयसीआयसीआय बँकेच्या शाखेत स्टॅंडअप-इंडिया अंतर्गत अर्ज करण्याच्या प्रक्रियेसाठी संपर्क केला तर माहिती मिळू शकते.

6.8 स्टार्टअप इंडिया योजनेचे ~~...~~ / आव्हाने

1) दलित उद्योजकता आणि महिला उद्योजकता सामाजिक-आर्थिक परिणामाविषयी लोकांच्या शिक्षणाकडे फारसे लक्ष दिले गेले नाही जर हे केले गेले नाही तर स्टार्टअप इंडिया योजना फार प्रभावी होणार नाही

2) या योजनेचे निकष असे म्हणतात की कंपनीने नाविन्यपूर्ण असणे आवश्यक आहे. एखादे उत्पादन नाविन्यपूर्ण आहे किंवा नाही याचा निर्णय डीआयपीपी च्या निर्णयावर अवलंबून आहे यामुळे विलंब होऊ शकतो आणि संभाव्यत: चांगले उद्योजक कार्य प्रक्रियेत बाद होऊ शकतात

3) कंपनीची 25 कोटीची उलाढाल असणे आवश्यक आहे महिलांच्या नेतृत्वात असे बरेच कमी उद्योजक असतात आणि एससी/एसटी नेतृत्ववाली सुद्धा या निकषानुसार नसतात

4) बचतगट ज्या विशेषत: ग्रामीण भागात महिला उद्योगांना काही उत्तेजन देत आहेत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांना अभिभूत (सोडून) केले आहे. स्टार्टअप इंडिया योजना या आव्हानांना तोंड देण्यासाठी कोणत्याही संस्थात्मक उपायाचा उल्लेख करत नाही

5) बँकिंग सेवांचा अद्याप बऱ्याच भागात प्रवेश केलेला नाही. म्हणून संस्थात्मक बँक जोडणीची कमतरता, लोकांमध्ये जागरूकता, डिजिटल डिव्हाइड आणि इतर अनेक तांत्रिक आव्हाने पंतप्रधान जनधन योजना यशस्वी असूनही काही अडथळे आहेतच

6) उत्पादन विकासासाठी 10 लाख ते 1 कोटीचा निधी पुरविला प्रत्यक्ष जात नाही

7) अनुसूचित जाती / जमाती आणि महिलांना तंत्रज्ञानाबाबत, कुशल कामगार प्रवेशाबाबत, क्षेत्राविषयीचे ज्ञान, व्यवस्थापनविषयक ज्ञान याबाबत पूर्ण सक्षम केलेले नाही तसेच अर्थपूर्णदृष्ट्या सक्षम झालेले नाही.

१० **योजनेचे यश** – सहकार चळवळीत आणि बचतगटाच्या चळवळीत सामील झालेल्या अनेक महिला उद्योग सेवा क्षेत्रात मोठा हातभार लावत आहेत. तसाच असा मत आहे की सरकार या योजनेच्या माध्यमातून महिलांना उत्पादन क्षेत्रातही सुरुवात करण्यासाठी संस्थात्मक चौकट आणि सहाय्य सेवा प्रदान करू शकते.

या योजनेचा लाभ अर्थपूर्ण पद्धतीने घेता यावा यासाठी अनुसूचित जाती-जमाती ~~लोकसंख्येला~~ लोकसंख्येला शिक्षित आणि सामाजिक आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविणे आवश्यक आहे. पुरेशा परिसंस्थेच्या आधारावर अंमलबजावणी केल्यास ही योजना खरोखरच ग्रामीण आणि शहरी भागातील सामाजिक आर्थिक वास्तवाचे कायापालट करू शकते आणि ग्रामीण व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे गांधीवादी निर्देश सिद्धांत पूर्ण होऊ शकतात. यासाठी जागरूकता किंवा जनजागृती करणे आवश्यक आहे.

1) ~~[illegible]~~ यासाठी सरकारने अधिकृत स्टँडअप इंडिया बाबत वेबसाइट तयार करून सर्व प्रकारची माहिती ठेवण्यात आली आहे, त्यात वेबपोर्टलवर प्रेरणादायक कथा देखील ~~[illegible]~~ ठेवण्याचा प्रयत्न आहे. सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर या योजनेबद्दल जनजागृती करण्यासाठी एक समर्पित फेसबुक पृष्ठ देखील स्थापन करण्यात येणार आहे. योजना यशस्वी होण्यासाठी शासनाकडून विविध प्रयत्न करण्यात येत आहे.